वाचा :- कृपया, शासन निर्णय क्र.बीयुडी-2010/प्र.क्र.26/विसयो-1, मंत्रालय, मुंबई दि. 29 एप्रिल, 2010 चे अवलोकन व्हावे.

जा.क्र. 2010/संगायो/अनुदान/ कावि/CR-26

**जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली**

दिनांकः -03/05/2010 10/5/2010

**आदेश.**

ज्या अन्वये **श्रावणबाळ सेवाराज्य निवृत्तीवेतन** योजनेच्या अंमलबजावणी करीता आवश्यक असलेल्या खर्चासाठी "महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक 2010" अन्वये मंजूर झालेली तरतूद माहे एप्रिल, 2010 व मे, 2010 साठी रू. 1,70,00,000/-, (अक्षरी- एक कोटी सत्तर लाखरूपये केवळ) या शासन निर्णयानुसार वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

तसेच शासन निर्णय क्र.विसयो-2008/प्र.क्र.78/विसयो-1 दि.30 सप्टेंबर 2008 नुसार लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्यासंबंधी जी पध्दती निर्धारीत केली आहे त्याच पध्दतीने या योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्यात यावे. सदरहू वितरीत अनुदान "मागणी क्र. एन-3 मुख्य लेखाशिर्ष 2235 - सामाजिक सुरक्षा व कल्याण, 02-समाजकल्याण, 104 वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण, (08)(07) श्रावणबाळ सेवाराज्य निवृत्तीवेतन योजना (22353112) 50- इतर खर्च या लेषाशिर्षाखाली खर्ची टाकावा.

तसेच त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांचेकडे सुपूर्त करण्यात आलेल्या अनुदाना पेक्षा जास्त होणार नाही या बाबत दक्षता घ्यावी. लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले अनुदान बँक खाते / पोस्ट बचत खाते (पोस्ट ऑफिस सेव्हिंग खाते) या मार्फतच वितरीत करण्यात यावे.

सदर उपलब्ध अनुदानाधून खालील तहसीलदार/नायब तहसीलदार (संगायो) जि.हिंगोली यांना खालील प्रमाणे अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | तालुक्याचे नांव | लाभार्थी संख्या | या आदेशान्वये वितरीत अनुदान रू.300 प्रमाणे | | वितरीत अनुदान | एकूण वितरीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एप्रिल | मे | | |
| 1 | हिंगोली | 16900 | 4806700 | 4806700 | 9613400 | 9613400 |
| 2 | वसमत | 6077 | 1823100 | 1823100 | 3646200 | 3646200 |
| 3 | कळमनूरी | 3714 | ·1114200 | 1114200 | 2228400 | 2228400 |
| 4 | औंढा ना. | 1588 | 476400 | 476400 | 952800 | 952800 |
| 5 | सेनगांव | 932 | 279600 | 279600 | 559200 | 559200 |
| | **एकूण** | **29211** | **8500000** | **8500000** | **17000000** | **17000000** |

सर्व अहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अशा सुचना देण्यात येत आहेत की, त्यांनी वरील दर्शीवलेल्या तरतुदी मधून मा.सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक विसयो-2008/प्र.क्र./78/ विसयो-1, दिनांक 30 सप्टेंबर 2008 मध्ये लाभार्थ्यांना अर्थ सहाय्य वितरणा संबधातील जी पध्दती निर्धारीत केली आहे, त्याच पध्दतीने या योजनेमधील लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्यात यावे. तसेच नियंत्रण अधिकाऱ्याने मंजूर अनुदाना पेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच शासन निर्णय क्र.विसयो/2008/प्र.क्र.248/विसयो-1, दिनांक 22 जानेवारी 2009 अन्वये नमुद केल्याप्रमाणे निर्णयानुसार काटेकोरपणे अनुपालन करावे. प्रत्येक देयकावर लेखाशिर्ष, संगणक क्रमांक व मागणी क्रमांक इत्यादी अचूक टाकण्याची खबरदारी घ्यावी व खर्च झालेल्या अनुदानाचे जिल्हा कोषागार प्रमाणकासह मासिक विवरण पत्र न चुकता दर महिण्याच्या तीन तारखेपूर्वी या कार्यालयास सादर करण्यात यावेत. सादर न केल्यास त्याची संपुर्ण जवाबदारी संबधीत तहसिलदार यांचे वर राहील.

सदर अनुदान फक्त पात्र लाभार्थ्यांनाच वाटप करण्यात यावे. अपात्र लाभार्थ्यांना अनुदान वाटप झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत तहसीलदार यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी हिंगोली

3/5/10

प्रति,

1. मा.सचिव महाराष्ट्र शासन सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई 400032 यांना माहितीस्तव सादर.

2. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर

प्रतिलिपी:-

1. जिल्हा कोषागार अधिकारी यांना माहितीस्तव.

2. तहसिलदार हिंगोली / वसमत / सेनगाव / कळमनुरी / औंढा नागनाथ यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

3. उप कोषागार अधिकारी वसमत / कळमनुरी / सेनगाव / औंढा नागनाथ.

४. उप विभागीय अधिकारी हिंगोली / वसमत यांना पुढील कार्यवाहीस्तव.

जिल्हाधिकारी हिंगोली

3/5/10

10/5/2010

ISSUED
Date 10/5/10
Outward Clerk
Collector Office Hingoli